# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

क्रमांक संगाबाअवि-३/संपमूमं/१४५/२०२२
दिनांक : २८ मे, २०२२

प्रति,

प्राचार्य / मानद संचालक / विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ/
मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा / सर्व शैक्षणिक विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : उन्हाळी-२०२२ मधील परीक्षा संचालनाबाबत (फक्त उन्हाळी-२०२२ परीक्षेकरीता)**
**संदर्भ :** क्रमांक संगाबाअवि-३/संपमूमं/४९४/२०२२, दिनांक ११ मे, २०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील उन्हाळी-२०२२ परीक्षेकरीता पात्र विद्यार्थ्यांच्या (वार्षिक व सत्र पद्धती) परीक्षा संचालनाची कार्यपद्धती विविध प्राधिकारीणींनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने संदर्भांकित पत्रान्वये दिनांक ११/०५/२०२२ रोजी कळविण्यात आलेली आहे. प्राधिकरणांनी निर्णय घेते वेळी विद्यार्थी व विद्यार्थ्यांच्या भावनांचा पुरेपूर विचार केलेला आहे. उन्हाळी-२०२२ परीक्षा या Offline Discriptive पद्धतीनेच होतील, अशा सूचना सुद्धा दिनांक ११/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये परीक्षा विभागाने सर्व संबंधितांना विविध माध्यमांद्वारे दिल्या आहेत.

तथापि, सदर कार्यपद्धती प्रसिद्ध केल्यानंतर विविध विद्यार्थी संघटनांची उन्हाळी-२०२२ परीक्षा ऑफलाईन एम.सी.क्यू. (M.C.Q.) पद्धतीने घेण्याबाबत निवेदने प्राप्त झाली. सदर निवेदने उन्हाळी-२०२२ परीक्षेकरीता मा.कुलगुरूंद्वारे गठीत समितीच्या समक्ष सादर करण्यात आली. समितीची शिफारस विद्या परिषदेच्या दिनांक २८/०५/२०२२ रोजीच्या सभेसमक्ष ठेवण्यात आली.

सदर शिफारसींवर विद्या परिषदेने विचार विनिमय करुन दिनांक ११/०५/२०२२ रोजी निर्गमीत पत्राद्वारे कळविलेल्या परीक्षा पद्धतीनेच परीक्षा घ्याव्यात, असा एकमुखाने निर्णय घेतला.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी-२०२२ च्या परीक्षा ह्या दिनांक ११/०५/२०२२ रोजी जाहीर करण्यात आलेल्या परीक्षा पद्धतीप्रमाणेच व विद्यापीठाद्वारे यापूर्वी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार होतील. सर्व संबंधितांनी त्याअनुषंगाने परीक्षेच्या नियोजनासंदर्भात नोंद घ्यावी, ही विनंती. याबाबत संबंधीत विद्यार्थ्यांना अवगत करुन द्यावे.

आपला,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रतिलीपी : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

(१) वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(२) प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
(३) समन्वयक, विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(४) यंत्रणा विश्लेषक (आय.सी.आर.), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(५) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(६) उपकुलसचिव (परीक्षा/चौकशी), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(७) सहाय्यक कुलसचिव (आचार्य कक्ष), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(८) सहाय्यक कुलसचिव (परीक्षा), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(९) सहाय्यक कुलसचिव (गोपनीय), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(१०) सहाय्यक कुलसचिव (सारणी), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(११) सहाय्यक कुलसचिव (सं.प.मू.मं. कार्यालय), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(१२) मा.कुलगुरूंचे स्विय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(१३) कुलसचिवांचे स्विय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(१४) मुख्य अधिकारी, केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ